# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १३.१०.२०२६ मंगळवार**

**गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

दिनांक १३.१०.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे तसेच, रेकॉर्डवरील असे एकूण ०७ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) व मा. श्री. वैभव जाधव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), श्री. दर्शन पाटील (पोनि. सामाजिक सुरक्षा पथक) हे उपस्थित होते. तसेच, एकूण २० पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार आणि आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण २२० अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**(कामगिरी)**

**१) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १३.१०.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, भिमनगर वस्ती वार्ड नं. ०४, येथे एक लाल शर्ट घातलेला इसम पोलीसांना पाहुन पळाल्याने त्याचा पाठलाग करून त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विकास उर्फ विक्की मोहन रहांगडाले वय ३७ वर्षे रा. भिमनगर वस्ती, वार्ड नं. ०४, एमआयडीसी नागपूर असे सांगीतले. पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४, दिनांक १३.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व

त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. गोकूळ महाजन, पोहवा. दीपक ठाकूर, गजानन राठोड, पंकज मिश्रा, पोअं. सचिन सोनवणे व सचिन कावळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.१०.२०२६ चे ०१.५० वा. चे सुमारास, नविन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सुदर्शन भवन, गवळीपुरा समोर, कामठी येथे पांढरे कत्थ्या रंगाची हाफ टि—शर्ट घातलेला इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आयुष मुन्नालाल ग्राय, वय २० वर्षे, रा. रमा नगर, कामठी, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यात एक लोखंडी चाकु किंमती ३००/— रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नविन कामठी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— अकस्मात मृत्यूवरून जिवे ठार मारण्याचा गुन्हा दाखल, आरोपीस अटक.**

दिनांक १२.१०.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, प्लॉट नं. २२२, मातोश्री नगर, खंगार ले—आऊट, वानाडोंगरी येथे राहणाऱ्या सौ. कविता गणेश पिंपळशेंडे, वय ३८ वर्षे ह्या त्यांचे राहते घरी किचनरूममध्ये हिटर ने पाणी गरम करीत असतांना, त्यांना ईलेक्ट्रीक करंट लागल्याने त्या खाली पडुन बेशुध्द झाल्या. नातेवाईकांनी त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादी धनराज फुलचंद पिंपळशेंडे, वय ४७ वर्षे, रा. बालाजी नगर, हिंगणा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीत शव विच्छेदन अहवालामध्ये वैद्यकीय अधिकारी यांनी मृतक हिचा अनैसर्गिक मृत्यु झाल्याचा प्राथमिक लेखी अभिप्राय दिला. तसेच, मृतक हिचे डोक्यावर प्रहार करून, तिला जिवानीशी ठार केले व तीचा मृत्यु ईलेक्ट्रीक करंट ने झाल्याचा दिखावा करण्यासाठी तीला हिटरने चटके दिले असा अंदाज डॉक्टरांनी सांगीतल्याने, पोलीसांनी तात्काळ तपास सुरू करून, तांत्रीक तपास करून, गुन्ह्यातील आरोपी हा घटनास्थळी घटनेवेळी हजर असल्याचे समजल्याने, आरोपीस निष्पन्न करून, आरोपी नामे जावेद शेख सहीद मन्यार, वय ३३ वर्षे, रा. ९०९/२, शिव कॉलोनी, तह. रावेर, जि. जळगांव यास स्थानीक पोलीसांचे मदतीने त्याचे राहते घरून ताब्यात घेतले.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी सपोनि. गजानन काठेवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१),२२९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करून, आरोपीस गुन्ह्यात अटक केलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— जिवे ठार मारणारे आरोपी ताब्यात.**

फिर्यादी राकेश शैलेंद्र टिपरी, वय ३२ वर्षे, रा. गुप्ता स्टिल भंडारजवळ, गड्डीगोदाम, सदर, नागपुर यांचा मित्र नामे अभिजीत दिवाण सिडाम, वय २७ वर्षे, रा. पांढराबोडी चौकीमागे, अंबाझरी, नागपुर याचा

साऊंडसिस्टीमचा व्यवसाय आहे. दिनांक १२.१०.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास अभिजीत हा फिर्यादीस सदर येथे भेटला व त्याने सांगीतले की, सिस्टीम वाजविण्याकरीता त्याने गिट्टीखदान, गोंडमोहल्ला येथील बॅन्डवाले यांना बुक केले होते व त्यांना गाव हिरवा, तह आर्वी, जि. वर्धा येथे बॅन्ड वाजविण्याकरीता घेवुन गेला होता. व त्याने बॅन्डवाल्यांचे पैसे न दिल्याने, त्यांनी त्याचे साऊंडसिस्टीम घेवुन गेले आहेत. आपण पैसे देवुन, साऊंड सिस्टीम परत घेवुन येवु. असे म्हणुन दोघेही पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, दिनशॉ फॅक्टरी समोर, गोंडमोहल्ला येथे रात्री २२.३० वा. गेले. तेथे अभिजीत हा बॅन्डवाले चार ईसमांशी बोलत होता. त्यांचेमध्ये पैशाचे देवाण—घेवाण वरून वादविवाद होवुन शिवीगाळी व मारपीट झाली. त्यामध्ये त्या चार ईसमांनी अभिजीत यास हातबुक्कीने मारहाण केली आणि लोखंडी रॉडने कंबरेवर, डोक्यावर मारून तसेच, एकाने चाकुने हातावर मारून गंभीर जखमी केले. जखमी अभिजीत यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपींविरुध्द कलम ११८(२), ११५(२),३५२,३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. उपचारादरम्यान, दिनांक १३.१०.२०२६ चे ०८.५५ वा. डॉक्टरांनी अभिजीत यास तपासुन मृत घोषीत केले. प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून, गिट्टीखदान पोलीसांनी गुन्ह्यामध्ये कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये कलमवाढ केलेली आहे.

गिट्टीखदान पोलीसांनी गुन्ह्याचे तपासात घटनास्थळी भेट देवुन, आरोपींबाबत माहीती काढुन, तांत्रीक तपास करून, आरोपींना निष्पन्न करून, गुन्ह्यातील आरोपी १) श्रीशांत उत्तम सडमाके, वय १९ वर्षे, रा. आदीवासी नगर, बोरगांव रोड, दिनशॉ फॅक्टरी समोर, गिट्टीखदान, नागपुर २) महेश जितेंद्र वाढवे, वय १९ वर्षे, रा. टेका नाका, मानव नगर, गोंड मोहल्ला, कपीलनगर, नागपुर ३) ऋषभ राकेश सडमाके, वय २१ वर्षे, रा. बिजलीनगर, गोंड मोहल्ला, सदर, नागपुर व ४) आदेश कृष्ण सडमाके, वय २२ वर्षे, रा. आदीवासी नगर, बोरगांव रोड, दिनशॉ फॅक्टरी समोर, गिट्टीखदान, नागपुर यांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(मिसींग)**

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** फिर्यादी रौनक चंद्रकांत चौधरी, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. २८ ए, अशोक नगर, हनुमान मंदीर जवळ, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची बहीण नामे कु. खुशबु चंद्रकांत चौधरी, वय २२ वर्षे ही दिनांक १२.०९.२०२६ चे १८.०० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भा.न्या.सं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात— पांढऱ्या—निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातलेला आहे. भाषा— मराठी, हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** फिर्यादी आकाश भगवान रंगारी, वय ३५ वर्षे, रा. श्रीमती झबाबाई झोळे चे घरी किरायाने, अम्मा दर्गाह रोड, पवनपुत्र नगर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. संगीता आकाश रंगारी, वय ३३ वर्षे ह्या दिनांक २९.१०.२०२६ चे १७.०० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाल्या आहेत. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भा.न्या.सं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा सलवार व पायजामा घातलेले आहे. भाषा—मराठी, हिंदी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** फिर्यादी नंदु रतनबहादुर थापा, वय ३१ वर्षे, रा. अण्णाभाऊ साठे हॉल जवळ, सुदाम नगरी, अंबाझरी, नागपूर यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. अंजली

नंदु थापा, वय २५ वर्षे ह्या दिनांक ०९.१०.२०२६ चे ०८.०० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाल्या आहेत. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भा.न्या.सं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—४ फुट ५ इंच, केस—काळे लांब, अंगात— काळ्या रंगाचा सलवार व राखाडी रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा—हिंदी बोलतात.


कु. खुशबु


सौ. संगीता


सौ. अंजली

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**